# 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे दर्शन

**प्रोफेसर डॉ. सुजय बाबुराव पाटील,** मराठी विभाग, कमला कॉलेज, कोल्हापूर.

---

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय जनमाणसावर प्रभाव टाकणारे व्यक्तीमत्व म्हणजे डॉ बाबासाहेब आंबेडकर होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विश्वास वाटत होता की, दलितांच्या उद्धारासाठी उच्चवर्णीयांची सहानुभूती आणि सद्भावना उपयुक्त नाही तर दलित बांधवांना स्वतःचा उद्धार करावयाचा असेल तर त्यांनी स्वतः जागृत होणं, सक्रीय होणं आवश्यक आहे. त्यासाठीच त्यांनी घोषणा केली होती. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' दलितांवरील अन्याय, अत्याचार, मानहानी नष्ट करायची असेल, दलित समाजातील न्यूनगंड नष्ट व्हायचा असेल, त्यांना सामाजिक पातळीवर सर्व बाबतीत सन्मान मिळायचा असेल तर दलित समाजाने शिक्षणाचे महत्त्व ओळखले पाहिजे. शिक्षणाला प्राधान्यक्रम दिला पाहिजे. त्यामुळेच दलित समाजासाठी शिक्षण प्रसार हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले जिवित कार्यच जणू मानले होते.

शिक्षणाबरोबरच राज्यव्यवस्थेमध्ये देखील दलित समाजाचे प्रतिनिधित्व महत्त्वाचे मानले होते. त्यामुळे देश आणि राज्याची ध्येय धोरण ठरविणाऱ्या लोकसभा व विधानसभेत दलित नेतृत्वाला समाधानकारक प्रतिनिधित्व, संधी मिळाली तर दलित समाजाच्या अनेक समस्या सहज सोडविता येतील अशी बाबासाहेबांची धारणा होती व यासाठी त्यांनी सदैव आग्रह धरलेला आपणास दिसून येतो.

राजकीय प्रतिनिधित्वाबरोबरच शासकीय नोकरदार वर्गात दलित समाजाला पुरेसे स्थान मिळाले पाहिजे. यासाठी कायद्यामध्ये सकारात्मक बदल घडवून आणून आरक्षणाच्या माध्यमातून दलित समाजाला शासकीय सेवेत योग्य ते प्रतिनिधित्व देऊन या समाजाला उन्नतीच्या मार्गाकडे नेता येऊ शकते असा बाबासाहेबांचा विचार होता, यासाठी त्यांनी अटोकाट प्रयत्न केले व त्याल यश देखील आले.

कोणत्याही समाजाची उन्नती व्हायची असेल त्या समाजातील महिलांना शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक इत्यादी पातळीवर सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे. त्यामुळेच फक्त दलित समाजातील स्त्रियांच्या उन्नतीला बाबासाहेबांनी प्राधान्य दिले असे नाहीतर भारतीय समाजातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांच्या उद्धाराचा विचार बाबासाहेबांनी महत्वाचा मानला. त्यासाठी त्यांनी 'हिंदू कोड बिल' सारखा ऐतिहासिक निर्णयाला राज्यमान्यता व समाज मान्यता मिळवून दिली. सर्व प्रकारचे विरोध झुगारून बाबासाहेबांनी 'हिंदू कोड बिला' च्या माध्यमातून समस्त महिला वर्गाला योग्य तो न्याय मिळवून दिला त्याबरोबरच शिक्षण, व्यवसाय, नोकरी या ठिकाणी स्त्रियांना आत्मसन्मान कसा मिळेल याचा विचार करून कायदेशीरदृष्ट्या महत्त्वाच्या तरतूदी केलेल्या दिसून येतात.

अशा अनेक पातळीवर व्यापक कार्य करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र अनेकांना आवाहन करताना दिसते. कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककार यांनी आपपाल्या साहित्यकृती मधून बाबासाहेबांच्या योगदानावर भाष्य केलेले दिसून येते आपापल्या दृष्टीकोनातून विचार मांडलेला दिसून येतो.

भारतीय पददलित समाज आणि त्याची अस्मिता यांचा प्रज्ञासूर्य म्हणून डॉ आंबेडकरांचे स्थान जनमाणसात सदैव आदराचे आणि अभिमानाचे असे आहे.

डॉ. आंबेडकर हे प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक पातळीवर आव्हान देणारे व्यक्तिमत्व आहे. आंबेडकरांच्या विद्यार्थी दशेतील चारित्र्यातून प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण कसे घ्यावे हे विद्यार्थी वर्गाला समजून घेता येते बॅरिस्टर आंबेडकरांच्याकडून कायद्याचे ज्ञान कोणासाठी व कसे वापरावे हे वकील व्यवसायात पदार्पण करणाऱ्या नवागताला शिकता येते. संघटन मजबूत करून लढावे कसे याचे बाळकडू सामान्य कार्यकर्त्याला डॉ.आंबेडकरांच्या संघर्षातील वृत्तीमधून मिळत राहते मनुस्मृतीचे दहन करणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्याकडून जातीअंताच्या लढ्यात घट्ट पाय रोवून लढावे कसे हे जाती निर्मूलनासाठी लढणाऱ्याला समजून घेता येते अशा अनेक पातळीवर डॉ. आंबेडकराचे व्यक्तीमत्व प्रत्येकाला दिशादर्शक ठरते. यामुळे प्रत्येक कालखंडातील प्रत्येक व्यक्तीला डॉ. आंबेडकरांचे चरित्र हे आवाहन करते आणि मार्ग देखील देते आणि हेच त्यांच्या व्यक्तीमत्वाचे वेगळेपण आहे. स्वतः माणूस म्हणून जगणाऱ्याला व दुसऱ्याचे माणूसपण अभंग ठेवणाऱ्याला डॉ. बाबासाहेबांचे वेगळेपण नेहमीच आकर्षित करीत आलेले आपणास दिसते.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे संगणकाचे युग आहे या युगात वावरणारे डॉ. आंबेडकरांचे अनुयायी याच संगणकाच्या भाषेत त्यांचे योगदान मार्मिकपणे शब्दबद्ध करताना दिसतात. या दृष्टीने अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहातील कविता महत्वाच्या वाटतात. यातील 'तू मदर बोर्ड माझ्या संगणकाचा' ही कविता विशेष लक्षवेधी ठरते. या कवितेच्या सुरुवातीस कवी लिहितो-

'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा
आणि मल्टीमिडीया की-बोर्ड
हा संगणक, ही मेमरी अन्
अपडेट प्रोग्रॅमही तूच दिलेला'

या ठिकाणी कवी 'मदरबोर्ड' संगणक, 'मल्टीमिडीयाचा की-बोर्ड', मेमरी, अपडेड प्रोग्रॅम यासारख्या आधुनिक संगणकीय जगातले शब्द वापरून बाबासाहेबांची प्रतिमा अधिकच भक्कम करण्याचा प्रयत्न करतो.

डॉ. आंबेडकरांचे एक वेगळेपण असे आहे की, त्यांना समकालीन असणाऱ्या तत्कालीन समाजातील समाजसुधारकांचे कार्य, त्यांच्या माघारी थांबले, त्यांचे कार्य पुढे चालवणारे कर्ते वारस पुढे आले नाहीत, पण डॉ. आंबेडकरांच्या बाबतीत तसे काही झाले नाही.

डॉ. आंबेडकरांच्या माघारी त्यांचे असंख्य कार्यकर्ते पुढे आले. त्यांचे कार्य मोठ्या तडफेने त्यांनी सुरू ठेवलेले दिसते. म्हणूनच हा कवी पुढे म्हणतो,

'तुझे समकालीन महापुरुष जाऊन बसलेत
इतिहासाच्या पुस्तकात सिनिअर सिटीझन सारखे
एकमेकांच्या प्रकृतीच्या चौकश्या करत
तूच फक्त फिरतो आहेस, बारा हत्तीच बळ घेऊन
रस्त्यातून, मैदानातून, गरिबांच्या झोपड्यातून
विद्वानांच्या चर्चा अन्
दु:खावलेल्यांच्या विवादांतून
कायदे-कानून विद्या आणि विद्यापीठातून
नाटक, गाणी, सिनेमा आणि साहित्य संमेलनातून
पुन्हा पुन्हा उठवायला येतोस कवितेतून'

डॉ. आंबेडकरांचे व्यक्तीमत्व कमालीच्या संघर्षातून पुढे आलेले होते. आपल्याला आलेल्या अनेक अडचणी आपल्या समाजाच्या पुढच्या पिढीला येवू नयेत म्हणून त्यांनी अत्यंत चाणाक्षपणे सावधगिरीच्या अनेक खुणा दिशादर्शक म्हणून तयार करून ठेवलेल्या होत्या. त्या पाऊल वाटेवरूनच त्यांच्या भावी कार्यकर्त्यांची वाटचाल यशस्वी होऊन गेली. यांचे श्रेय डॉ. आंबेडकरांना देताना ही पिढी म्हणते -

'पोरगं हरवू नये म्हणून
बाप पुढे जावून रस्त्यावर उभा राहतो
तसा तू पुढे आलास एकवीसाव्या शतकात
आमच्याही आधी'

दलितांच्या सन्मानाच्या आड येणारे त्यांचे माणूसपण नाकारणारी व्यवस्था काही निमित्ताने पुन्हा डोके वर काढते. दलितांना डि-लिट करण्याची चाल खेळते. डॉ. आंबेडकर शरीररुपाने अस्तिवात नसल्याचा गैरफायदा उठविण्याचा प्रयत्न करते. पण भावी पिढीच्या रोमा-रोमात डॉ. आबेडकरांनी पेरलेली विचारसुत्रे या कर्मठ मनोवृत्तीला शह देऊन प्रत्येक पातळीवर त्यांची चाल निष्फळ करण्याचा यशस्वी प्रयत्न करते. डॉ. आबेडकरांच्या विचारातील हे चिरंजिवित्व व्यक्त करताना कवी पुढे लिहतो,

'आता या आयटीच्या युगात
दलितांना डि-लीट करण्यासाठी
नव-नवीन सॉफ्टवेअर येत आहेत
आणि प्रोग्रॅम खराब करण्यासाठी
सोडले जात आहेत विषाणू
तरीही तुझी अॅन्टीव्हायरस खबरदारी
पुन्हा पुन्हा करते त्यांना पराभूत'

डॉ. आंबेडकर संपूर्ण दुनियेत बाबासाहेब या नावाने ओळखले जातात. पण कवी येथे त्यांना 'मदर' हा शब्द वापरतो, इंग्रजी शब्द कोषात मदरचा अर्थ आई आहे तर, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात 'मदर' हा शब्द संगणकाचा मजबूत पायाभूत घटक या अर्थाने वापरला जातो. याचाच अर्थ दलित समाजाचे तत्त्व जागृत करणारे त्यांचा हक्क त्यांना मिळवून देणारे डॉ आंबेडकर हे जसे बाबासाहेब आहेत तश्याच प्रकारे ते या समाजाचे अधिष्ठान मजबूत करणारे आई देखील आहेत. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या संदर्भातील 'मदर' हे सूचक आजच्या जगात अत्यंत महत्त्वाचे आहे. अशा प्रकारे अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य कर्तृत्वावर, सामाजिक योगदानावर आधुनिक पद्धतीने भाष्य करणाऱ्या कविता महत्वपूर्ण वाटतात.

**निष्कर्ष :**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन चरित्र फक्त दलितांनाच नव्हे तर दलितेतरांना देखील प्रेरणादायी ठरलेले आहे
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी फक्त दलितांचा नव्हे तर संपूर्ण भारतातील दलितेतर बांधवांच्या उत्थानाचा विचार केलेला आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा फक्त एका विशिष्ट समाजामध्ये बंदिस्त करून ठेवणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे आहे.
- भारतातील सर्व भाषातील अनेक साहित्यकारांच्या कलाकृतीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार प्रभाव असलेला दिसतो.
- आधुनिक जगातील अनेक नवसंदर्भाच्या माध्यमातून बाबासाहेबांच्या विचारावर साहित्यिक भाष्य करताना दिसतात

**संदर्भ ग्रंथ:**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई १९९३.
२) नंतर आलेले लोक - अरुण काळे – लोकवाङ्मय गृह प्रकाशन, २००१.
३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन व कार्य - संकलन व प्रस्तावना लक्ष्मण गायकवाड, प्रकाशक साहित्य अकादमी, २०१२.